जाहीरात.

# मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), गडचिरोली यांचे कार्यालय.

## वन प्रशासकिय भवन पोटेगाव रोड, गडचिरोली.

### वन विभागातील (गट क) भरती प्रक्रिया सन २०१९.

जाहीरात क्रमांक- १३४७ दिनांक -२०/०१/२०२०

वन विभागातील अनुसूचीत जमाती प्रवर्गातील निर्माण करण्यात आलेल्या अधिसंख्य पदामुळे रिक्त झालेल्या अनुसूचित जमाती प्रवर्गातील (गट-क) पदे जात वैधता प्रमाणपत्र धारक उमेदवारांमधुन सरळसेवेने भरावयाची आहेत. त्यासाठी अर्हता धारक उमेदवाराकडून विहित नमुन्यात ऑफलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अर्ज भरण्याची सुरुवात | अर्ज भरण्याची अंतिम मुदत |
|---|---|
| दिनांक २७-०१-२०२० | दिनांक १०-०२-२०२० |

## १.० सवर्ग :- वनरक्षक

| अ.क्र | पदांचे नांव | प्रवर्ग | एकुण पद संख्या | महिला | सर्वसाधरण |
|---|---|---|---|---|---|
| १ | वनरक्षक बिगर अनुसुचित क्षेत्र) | अनुसुचित जमाती | ०३ | ०१ | ०२ |
| २ | वनरक्षक ( अनुसुचित क्षेत्र) | अनुसुचित जमाती | ०६ | ०२ | ०४ |

टिप-अ) अनुसुचित क्षेत्रातील ६ पदांकरीता फक्त गडचिरोली जिल्हयातील अनुसुचित क्षेत्रातील (पेसा) स्थानीक अनुसुचित जमातीचाच उमेदवार अर्ज करु शकेल. स्थानिक अनुसूचित जमातीचा उमेदवार याचा अर्थ जे अनुसूचित जमातीचे उमेदवार स्वत: किंवा आई-वडील किंवा आजी-आजोबा संबधित जिल्हयाच्या अनुसूचित क्षेत्रामध्ये २६ जानेवारी १९५० पासून सातत्याने वास्वव्य करीता आहेत.

ब) पदांच्या संख्येमध्ये बदल होण्याची शक्यता आहे.

क) वरील बिगर अनुसुचित क्षेत्रातील अनुसूचित जमातीचे ३ पदांमध्ये चंद्रपुर वनवृत्ताचे आस्थापनेवरील २ पदांचा समावेश आहे. निवड झालेल्या ३ उमेदरांमधुन २ उमेदवारांना चंद्रपुर वनवृत्ताचे तर १ उमेदवार यांना गडचिरोली वनवृत्ता करीता नियुक्ती आदेश दिल्या जातील.

ड) अर्जासोबत जात वैद्यता प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. अन्यथा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.

२. **वेतनश्रेणी** :- सातव्या वेतन आयोगानूसार वेतनस्तर एस-५ (१८०००-५६९००)

३. **शैक्षणिक पात्रता** :- माध्यमीक शालान्त प्रमाणपत्र (१० वी) उत्तीर्ण असावा

४. **वयोमर्यादा**- उमेदवार अर्ज भरण्याच्या अंतिम तारखेस १८ वर्षापेक्षा कमी व ३० वर्षापेक्षा जास्त वयाचा नसावा

५. शारिरिक पात्रता :-

(अ) उमेदवाराने खालीलप्रमाणे उंची, छाती व वजन निकष पुर्ण केलेले असावे.

| शारिरीक माप | पुरुष | स्त्री |
|---|---|---|
| अनुसूचित जमातीमधील उमेदवारासाठी खालीलप्रमाणे शिथिलक्षम- | | |
| किमान उंची (से.मी.) | १५२.५ | १४५ |
| छातीचा घेर-<br>न फुगवाता (से.मी. मध्ये)<br>फुगवून (से.मी. मध्ये) | <br>७९<br>८४ | <br>-<br>- |
| वजन (कि.ग्र.मध्ये) | वैद्यकीय मापानुसार उंची व वयाच्या योग्य प्रमाणात | वैद्यकीय मापानुसार उंची व वयाच्या योग्य प्रमाणात |

(ब) उमेदवाराने दुरदृष्टी आणि जवळील दृष्टीचे व विना चष्म्याचे खालील निकष पुर्ण केले असावे.

| दुर दृष्टी | | |
|---|---|---|
| अधिक चांगला डोळा | (सुधारलेली दृष्टी) | वाईट डोळा |
| ६/६<br>किंवा<br>६/९ | | ६/१२<br>किंवा<br>६/९ |
| | जवळील दृष्टी | |
| अधिक चांगला डोळा | (सुधारलेली दृष्टी) | वाईट डोळा |
| J.१ | | J.११ |

प्रत्येक डोळा संपुर्ण क्षेत्र दृष्टीयुक्त असणे आवश्यक आहे.

(क) शासकिय वैद्यकीय अधिकारी किंवा वैद्यकीय तपासणी संदर्भात प्राधिकृत केलेल्या वैद्यकीय विशेषज्ञांकडून वैद्यकीय पात्रता प्रमाणित करण्यांत येईल. वैद्यकीय चाचणीमध्ये तिरळेपणा, रंग व रात आंधळेपणा, आतल्या बाजूला फेंगाडे असलेले गुडघे, सपाट पाय, त्वचा व छातीचे रोग या संबंधिचा आणि अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग) यांनी वेळोवेळी विहित केलेल्या अन्य वैद्यकीय चाचणीचा समावेश राहील.

६. **ज्या उमेदवारांचे प्राप्त अर्ज छाननी नंतर भरती प्रक्रियेचे पुढिल टप्प्यांसाठी पात्र ठरतील त्यांची लेखी परिक्षा खालील प्रमाणे गडचिरोली मुख्यालयात घेण्यात येईल.**

अ. लेखी परीक्षेकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांना उपवनसंरक्षक गडचिरोली,यांचे कार्यालयातुन दिनांक-२२/०२/२०२० रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळात प्रवेशपत्र जारी करण्यांत येतील. सदर ओळखपत्र निवड प्रक्रियेच्या प्रत्येक टप्प्यावर उमेदवारांना दाखविणे आवश्यक राहिल.ओळखपत्र प्राप्त करतांना पुढिल पैकी एक पुरावा सादर करणे आवश्यक आहे.
(पॅन कार्ड/पासपोर्ट/वाहन परवाना/आधार कार्ड/मतदार ओळखपत्र, ईत्यादी)

ब. पात्र असलेल्या उमेदवारांची १२० गुणांची स्पर्धात्मक लेखी परिक्षा घेण्यात येईल. लेखी परिक्षेमध्ये खालीलप्रमाणे ४ विषयांना गुण देण्यात येईल.

| अ.क्र. | विषय | गुण |
|---|---|---|
| १ | सामान्य ज्ञान<br>(सामान्य ज्ञान, महाराष्ट्र राज्याचा भूगोल व इतिहास, वन, पर्यावरण, हवानाम, जैव विविधता, वन्यजीव, पर्यावरण संतुलन) | ३० |
| २ | बौध्दीक चाचणी | ३० |
| ३ | मराठी | ३० |
| ४ | इंग्रजी | ३० |

१) लेखी परिक्षे करीता प्रवेश पत्र प्राप्त करणे व कागदपत्र पडताळणीसाठी व भरती प्रक्रियेच्या सर्व टप्प्यांसाठी येण्या-जाण्यासाठी येणारा खर्च उमेदवाराला स्वतः करावा लागेल.
२) लेखी परीक्षा ही माध्यमिक शालांत (१० वी) पातळीची राहील.
३) लेखी परिक्षा ही गडचिरोली मुख्यालयात घेण्यात येईल.लेखी परीक्षा ही ९० मिनिटाची राहील. लेखी परिक्षेच्या प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाच्या असतील व प्रश्नपत्रिकेतील प्रत्येक प्रश्नास अधिकाधिक १ गुण ठेवण्यांत येतील.
४) ४५ % किंवा त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त करणारे उमेदवार भरतीच्या पुढील टप्प्याकरीता पात्र राहतील. ज्या उमेदवारांना किमान ४५% गुण मिळणार नाहीत ते उमेदवार भरतीच्या पुढील टप्प्यासाठी बाद ठरतील.
५) उमेदवारांना परिक्षा दालनात मोबाईल फोन अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्टॉनिक साधने आणण्यास/वापरण्यास सक्त मनाई आहे.
६) परीक्षा दालनात परीक्षेच्या वेळेपुर्वी ३० मिनिट अगोदर हजर राहणे बंधनकारक राहील. परीक्षेवेळी इकडे-तिकडे बघणे, डोकावणे, तोतयागिरी करतांना आढळल्यास उमेदवारास परीक्षा केंद्रावाहेर पाठविण्यांत येईल.
७) लेखी परिक्षेच्या वेळी फक्त पेन,परिक्षा प्रवेशपत्र,ओळखीचा पुरवा सोबत आणने आवश्यक आहे.
८) परिक्षेच्या वेळी उमेदवाराने पुढिल पैकी एक पुरावा सादर करणे आवश्यक आहे.
(पॅन कार्ड/पासपोर्ट/वाहन परवाना/आधार कार्ड/मतदार ओळखपत्र, ईत्यादी)
९) डिजीटल डायरी,पेजर,मायक्रोफोन,मोबाइल फोन,कॅमेरा अंतभृत असलेली कोणतेही प्रकारची साधने,सिमकार्ड ब्लु टयुथ,दुरसंचार साधने म्हणून वापरण्यायोग्य कोणतेही वस्तु,इलेट्रॉनिक्स उपकरणे,वहया,नोट्स,कोणत्याही प्रकारची पुस्तके,बॅग्ज,कॅलक्युलेटर,इत्यादी प्रकारची साधने /साहित्य परीक्षा केंद्राच्या परीसारात तसेच परिक्षा केंद्रात आणण्यास स्वत:जवळ बाळगण्यास त्याचा वापर करण्यास अथवा त्याचा वापर करण्यासाठी इतरांची मदत घेण्यास सक्त मनाई आहे.असे साहित्य आणल्यास ते परिक्षा केंद्राबाहेर ठेवण्याची व त्याच्या सुरक्षेची जबाबदारी उमेदवाराची राहील.
१०) निवडणुक अथवा नैसर्गिक आपत्ती किंवा अन्य कारणामुळे विहित दिवशी परिक्षा घेणे शक्य झाले नाही तर सोयीच्या अन्य दिवशी परिक्षा घेण्यात येईल.

**७. शारीरिक मोजमाप व धाव चाचणी घेणे :-**

लेखी परीक्षेत ज्या उमेदवारांनी किमान ४५% गुण प्राप्त केले आहेत अशा उमेदवारांची तपासणी खालील प्रमाणे प्रादेशिक निवड समितीव्दारे करण्यांत येईल.

**अ.** वयोमर्यादा,शैक्षणिक अहर्ता,जात वैद्यता,आरक्षण प्रवर्ग इत्यादीबाबत उमेदवारांच्या मुळ कागदपत्राची तपासणी करण्यांत येऊन जे उमेदवार आवश्यक कागदपत्रे सादर करणार नाहीत ते भरती प्रक्रियेतून बाद ठरतील.

**ब.** वनरक्षक पदाच्या प्रचलित सेवाप्रवेश नियमानुसार किमान शारीरीक पात्रता (उंची, छाती इत्यादी) धारण करतांना किंवा कसे हे निश्चित करण्याच्या दृष्टीने शासकिय वैद्यकीय अधिकारी यांचया उपस्थितीत उमेदवारांची शारीरीक मोजमापे घेण्यात येतील. जे उमेदवार विहित शारीरिक पात्रता धारण करणार नाही ते भरती प्रक्रियेतून बाद होतील.

**क.** कागदपत्र तपासणी व शारिरीक मोजमाप यामध्ये अपात्र ठरलेले उमेदवार वगळून इतर पात्र उमेदवारांनी धावण्याच्या चाचणीकरीता शारिरीक दृष्टयात सुदृढ असल्यावाबतचे प्रमाणपत्र वैद्यकीय अधिकारी यांचेकडून प्राप्त करुन घेऊन धावण्याच्या चाचणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील. (सोबत जोडलेल्या प्रपत्र-१ व २ प्रमाणे)

**ड.** वैद्यकीय अधिकारी यांचेकडून प्राप्त प्रमाणपत्राचे आधारे, पुरुष उमेदवारांची ३० मिनीटात ५ कि.मी. धावण्याची चाचणी घेण्यात येईल व महिला उमेदवारांची २५ मिनिटात ३ कि.मी. धावण्याची चाचणी घेण्यात येईल. जे उमेदवार धाव चाचणीतील विहित वेळेत पुर्ण करणार नाही ते भरती प्रक्रियेतून बाद ठरतील.

**ई.** महाराष्ट्र शासन, महसुल व वनविभाग, शासन निर्णय क्रमांक एफएसटी-०७/१८/प्र.क्र३२३/फ-४, दिनांक २८-०८-२०१८ नुसार, धावण्याच्या चाचणीत नोंदविलेल्या वेळेचे अनुषंगाने उमेदवारांना खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे गुण देण्यात येतील.

| पुरुष उमेदवार ५ कि.मी. अंतर धावण्याची चाचणी (एकुण गुण:८०) | | |
|---|---|---|
| अ. क्र. | धावण्याची चाचणी पूर्ण करण्यासाठी लागलेला कालावधी (मिनिटांमध्ये) | अनुज्ञेय गुण |
| १ | १७ मिनीट किंवा त्यापेक्षा कमी | ८० |
| २ | १७ मिनीट पेक्षा जास्त परंतू १८ मिनीट किंवा त्यापेक्षा कमी | ७० |
| ३ | १८ मिनीट पेक्षा जास्त परंतू १९ मिनीट किंवा त्यापेक्षा कमी | ६० |
| ४ | १९ मिनीट पेक्षा जास्त परंतू २० मिनीट किंवा त्यापेक्षा कमी | ५० |
| ५ | २१ मिनीट पेक्षा जास्त परंतू २१ मिनीट किंवा त्यापेक्षा कमी | ४५ |
| ६ | २१ मिनीट पेक्षा जास्त परंतू २२ मिनीट किंवा त्यापेक्षा कमी | ४० |
| ७ | २२ मिनीट पेक्षा जास्त परंतू २३ मिनीट किंवा त्यापेक्षा कमी | ३५ |
| ८ | २३ मिनीट पेक्षा जास्त परंतू २४ मिनीट किंवा त्यापेक्षा कमी | ३० |
| ९ | २४ मिनीट पेक्षा जास्त परंतू २५ मिनीट किंवा त्यापेक्षा कमी | ३५ |
| १० | २५ मिनीट पेक्षा जास्त परंतू २६ मिनीट किंवा त्यापेक्षा कमी | २० |
| ११ | २६ मिनीट पेक्षा जास्त परंतू २७ मिनीट किंवा त्यापेक्षा कमी | १५ |
| १२ | २७ मिनीट पेक्षा जास्त परंतू २८ मिनीट किंवा त्यापेक्षा कमी | १० |
| १३ | २८ मिनीट पेक्षा जास्त परंतू २९ मिनीट किंवा त्यापेक्षा कमी | ५ |
| १४ | २९ मिनीट पेक्षा जास्त परंतू ३० मिनीट किंवा त्यापेक्षा कमी | ० |
| ३० मिनीटामध्ये ५ कि.मी. धावू न शकणारा पुरुष उमेदवार भरती प्रक्रियेतून बाद होईल. | | |

| महिला उमेदवार ३ कि.मी. अंतर धावण्याची चाचणी (एकुण गुण:८०) | | |
|---|---|---|
| अ. क्र. | धावण्याची चाचणी पूर्ण करण्यासाठी लागलेला कालावधी (मिनिटांमध्ये) | अनुज्ञेय गुण |
| १ | १२ मिनीट किंवा त्यापेक्षा कमी | ८० |
| २ | १२ मिनीट पेक्षा जास्त परंतू १३ मिनीट किंवा त्यापेक्षा कमी | ७० |
| ३ | १३ मिनीट पेक्षा जास्त परंतू १४ मिनीट किंवा त्यापेक्षा कमी | ६० |
| ४ | १४ मिनीट पेक्षा जास्त परंतू १५ मिनीट किंवा त्यापेक्षा कमी | ५० |
| ५ | १५ मिनीट पेक्षा जास्त परंतू १६ मिनीट किंवा त्यापेक्षा कमी | ४५ |
| ६ | १६ मिनीट पेक्षा जास्त परंतू १७ मिनीट किंवा त्यापेक्षा कमी | ४० |
| ७ | १७ मिनीट पेक्षा जास्त परंतू १८ मिनीट किंवा त्यापेक्षा कमी | ३५ |
| ८ | १८ मिनीट पेक्षा जास्त परंतू १९ मिनीट किंवा त्यापेक्षा कमी | ३० |
| ९ | १९ मिनीट पेक्षा जास्त परंतू २० मिनीट किंवा त्यापेक्षा कमी | ३५ |
| १० | २० मिनीट पेक्षा जास्त परंतू २१ मिनीट किंवा त्यापेक्षा कमी | २० |
| ११ | २१ मिनीट पेक्षा जास्त परंतू २२ मिनीट किंवा त्यापेक्षा कमी | १५ |
| १२ | २२ मिनीट पेक्षा जास्त परंतू २३ मिनीट किंवा त्यापेक्षा कमी | १० |
| १३ | २३ मिनीट पेक्षा जास्त परंतू २४ मिनीट किंवा त्यापेक्षा कमी | ५ |
| १४ | २४ मिनीट पेक्षा जास्त परंतू २५ मिनीट किंवा त्यापेक्षा कमी | ० |
| २५ मिनीटामध्ये ३ कि.मी. धावू न शकणारा महिला उमेदवार भरती प्रक्रियेतून बाद होईल. | | |

८. **सर्वसाधारण गुणवत्ता व निवड यादी :-**

१. लेखी परीक्षेत प्राप्त गूण व धाव चाचणीतील प्राप्त गूण यांदी एकत्रित बेरीज करुन गुणवत्ता यादी तयार करुन ती प्रादेशिक निवड समिती मार्फत www.mahaforest.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यांत येईल.

२. गुणवत्ता यादीचे आधारे सामाजिक/समांतर आरक्षण विचारात घेवुन रिक्त पदांच्या अनुषगाने निवड व प्रतिक्षा यादी तयार करुन ती www.mahaforest.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यांत येईल.

३. निवड यादीतील सर्व उमेदवार व प्रतिक्षा यादीतील गुणाक्रमे ५०% उमेदवार (परंतू किमान १ उमेदवार) वनरक्षक पदासाठी ४ तासात पुरुष उमेदवारांना २५ कि.मी. व महिला उमेदवारांना १६ कि.मी. चालण्याची किंवा चालून व धावून शारीरिक क्षमता चाचणी पूर्ण करावी लागेल. जे उमेदवार सदर चाचणी विहीत वेळेत पूर्ण करु शकणार नाही ते भरती प्रक्रियेतून बाद ठरतील. सदर उमेदवारास चालण्याची चाचणी करिता दुसरी संधी दिली जाणार नाही.

४. निवड सूचितील उमेदवार चालण्याची चाचणीमध्ये अनुत्तीर्ण झाल्यास त्यांचेऐवजी प्रतिक्षा यादीतील उमेदवारांचा निवडीसाठी विचार करण्यांत येईल. यांनतरही त्या-त्या प्रवर्गातील उमेदवार कमी पडत असल्यास सबंधीत प्रवर्गातील सर्वसाधारण गुणवत्ता यादीतील उर्वरित उमेदवारांचा निवडीसाठी विचार करण्यांत येईल.

९. **उपरोक्त पदाकरिता परीक्षा शुल्क :-**

उमेदवारांनी राष्ट्रीयकृत बँकेचे गडचिरोली मुख्यालयात वटणारे (payable at Gadchiroli) धनाकर्ष (डी.डी.) द्वारे **प्रशासकिय अधिकारी,मुख्य वनंसरक्षक(प्रादेशिक)गडचिरोली** ( Administrative Officer CCF (T) गडचिरोली यांचे नांवे परिक्षा शुल्क खालीलप्रमाणे भरणा करावे.

| प्रवर्ग | शुल्क |
|---|---|
| अनुसूचित जमाती | रु. १५०/- |

**१० .महत्वाच्या सुचना**

१) उमेदवारांनी भरणा केलेली परिक्षा शुल्क कोणत्याही परिस्थितीत परत केले जाणार नाही.

२) उमेदवारांची निवड होयुन नियुक्ती मिळाल्यास त्यांना शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या सेवाप्रवेशोत्तर परिक्षा,विभागिय परिक्षा आणि इतर परिक्षा व प्रशिक्षण विहित संधीत व तिहित कालावधीत उत्तीर्ण करणे आवश्यक राहिल. अन्यथा शासनाने वेळोवेळी विहित केलेप्रमाणे सदरची नियुक्ती संपुष्टात आणणे इत्यादी कारवाई केली जाईल.

३) भरती प्रक्रियेचे दरम्यान किंवा त्यानंतर उमेदवारांनी अर्जासोबत किंवा प्रत्यक्ष वनावटी अथवा खोटी माहिती किंवा दस्तावेज सादर केल्याचे निदर्शणास आल्यास अशा उमेदवारांची केलेली निवड/नेमणुक रद्द करण्यात येईल.

४) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक अनियो/१०/०५/१२६/सेवा-४, दिनांक ३१-१०-२००५ नुसार दिनांक ०१-११-२००५ रोजी व त्यांनतर निवड होणाऱ्या उमेदवारांना नवीन पारिभाषीतम अंशदायी निवृत्तीवेतन योजना लागू राहील. त्यांना सद्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना (म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशिकरण) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशिकरण) नियम १९८४ आणि सद्या अस्तित्त्वात असलेली महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम लागु होणार नाही.

५) महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या अधिसूचना, शासन निर्णय, परिपत्रके व शुध्दीपत्रकामधील तरतुदी उमेदवारास बंधनकारक राहतील.

६) ज्या उमेदवारांनी यापर्वी जरी त्यांचे नांव रोजगाव व स्वंयरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे,सेवा योजन कार्यालय,समाजकल्याण,आदिवासी विकास प्रकल्प तसेच जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी कार्यालयात नोदविली असली तरी अशा उमेदवारांना विहीत मुदतीत स्वतंत्र्य रित्या ऑफलाईन पध्दतीने अर्ज सादर करणे व परिक्षा शुल्क भरणे आवश्यक राहिल.

**११.अर्जासोबत खालील दस्तावेज जोडणे आवश्यक आहे.**

अ) शैक्षणिक अहर्ता प्रमाणपत्र
ब) जात वैधता प्रमाणपत्र
क) पेसा क्षेत्रातील उमेदवार असल्यास पेसा क्षेत्रातील रहिवासी असल्याचा पुरावा
ड) उमेदवारांचा वयाचा पुरावा
इ) लहान कुटुंब प्रतिज्ञापत्र (प्रपत्र) सोबत जोडलेले आहे.
ई) परिक्षा शुल्क रु.१५०/- चा डीडी
ऊ) प्रवेशपत्राचा नमुना फोटो लावुन व पुर्ण भरुण
उ) विहीत नमुण्यातील अर्ज फोटो सह पुर्ण भरुण

सोवत देण्यात येत असलेल्या प्रपत्रात परिपुर्ण माहिती भरुण आवश्यक दस्तावेज जोडुन उमेदवारांनी विहित मुदतीत टपालाद्वारे/प्रत्यक्ष खालील पत्त्यावर आपला अर्ज सादर करावा.

१२. अर्ज सादर करावायाचा पत्ता

**मुख्य वनसंरक्षक,(प्रादेशिक),**
**वन प्रशासकिय भवन,**
**पोटेगांव रोड-गडचिरोली,ता.जिल्हा-गडचिरोली**
**पिन कोड-४४२६०५**

स्वा/-

**अध्यक्ष प्रादेशिक निवड समिती**
**तथा मुख्य वनसंरक्षक**
**(प्रादेशिक)गडचिरोली**

## प्रपत्र-१

## वनरक्षक पदाच्या उमेदवाराने धाव चाचणीच्या द्यावयाचे वचनपत्र.

वनरक्षक पदभरती-२०२० मध्ये मी खाली सही करणार वचनपत्र लिहुन देतो की, वनरक्षक पदभरती २०२० मध्ये मी उमदेवार म्हणून आवेदनपत्र दाखल केले आहे. उपरोक्त भरती प्रक्रियाचा भाग म्हणून शारीरिक क्षमता धाव चाचणीमध्ये ५ कि.मी. (पुरुष उमेदवारास) ३० मिनिटात/ ३ कि.मी. (स्त्री उमेदवारास) २५ मिनिटात पुर्ण करण्यांच्या धाव चाचणी मध्ये स्वेच्छेने सहभागी होत आहे. सदरहू धाव चाचणी करिता मी शारीरिक दृष्टया सक्षम आहे. उपरोक्त शारीरिक क्षमता धाव चाचणी दरम्यान माझी शारीरिक वा कोणत्याही प्रकारची हानी झाल्यास, त्यास शासन जबाबदार राहणार नाही.

करीता हे वचनपत्र लिहुन देण्यात येत आहे.

ठिकाण :- **अर्जदाराची स्वाक्षरी**

दिनांक :-

## प्रपत्र-२
## वनरक्षक भरती प्रक्रिया सन २०२०
## शारीरिकदृष्टया सुदृढ असल्याबाबतचे प्रमाणपत्र

| |
|---|
| उमेदवाराचे छायाचित्र |

१. उमेदवार क्रमांक (I.D.No.) ______________________________

२. अर्जदाराचे संपूर्ण नाव ______________________________

३. पदाचे नाव : वनरक्षक (गट-क)

**धाव चाचणीपूर्वी उमेदवार हे धावण्यासाठी शारीरिक दृष्टया सुदृढ असल्याबाबतचे वैद्यकीय प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यांत येते की, श्री/कु. ____________________________________________ हे पुरुष उमेदवाराकरिता ५ कि.मी./महिला उमेदवाराकरिता ३ कि.मी. धावण्यासाठी शारीरिक दृष्टया सुदृढ आहेत.

दिनांक :-

वैद्यकिय अधिकारी
(स्वाक्षरी व शिक्क्यासह)

## प्रपत्र-३
## लहान कुटुंबासाठी प्रतिज्ञापत्र.

मी श्री/श्रीमती/कुमारी ___________________________________ श्री ________________________ यांचा/यांची मुलगा/मुलगी पत्नी, वय _____ वर्ष _____ राहणार________________________________ याव्दारे पुढील प्रमाणे असे जारी करतो/करते की,

१. मी ___________________________________ या पदासाठी माझा अर्ज दाखल केला आहे.
२. आज रोजी मला _________________ (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८-०३-२००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या आहे. (असल्यास जन्म दिनांक नमुद करावा.)
३. हयात असलेल्या मुलांची संख्या २ पेक्षा अधिक असले तर दिनांक २८-०३-२००५ वा तदनंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अपात्र ठरविण्यांस पात्र होईल, याची मला जाणीव आहे.

ठिकाण :-

दिनांक :-

अर्जदाराची स्वाक्षरी

नाव:-

## मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) गडचिरोली,वन प्रशासकिय भवन,पोटेगांव-रोड,गडचिरोली

## वनरक्षक पद भरती प्रक्रिया २०२०

## अर्जाचा विहित नमुना

प्रति,
मुख्य वनसंरक्षक,(प्रादेशिक)
गडचिरोली

| उमेदवार यांचे पासपोर्ट आकारोचे फोटो |
|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | उमेदवारांचे संपुर्ण नांव | | | |
| २ | वडिलांचे नांव | | | |
| ३ | आईचे नांव | | | |
| ४ | विवाहित/अविवाहित | | | |
| ५ | विवाहित असल्यास अपत्य | | | |
| ६ | अर्ज कोणत्या जागेकरीता आहे. (अनुसुचित क्षेत्र/ बिगर अनुसुचित क्षेत्र) | | | |
| ७ | लिंग, महिला/पुरुष | | | |
| ८ | जात व प्रवर्ग | | | |
| ९ | शैक्षणिक अहर्ता | | | |
| १० | जन्म तारीख | **दिनांक** | **महिना** | **वर्ष** |
| ११ | जात वैधता आहे काय | | | |
| १२ | पत्रव्यवहाराचा पत्ता | | | |
| १३ | मोबाईल क्रमांक | | | |
| १४ | असल्यास मेल आयडी | | | |

**दिनांक-** **अर्जदाराची सही**

**मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), गडचिरोली वन प्रशासकीय भवन, पोटेगाव - रोड, गडचिरोली अंतर्गत**
**अनुसूचित जमाती विशेष भरती मोहीम**
**अंतर्गत वनरक्षक पद भरती प्रक्रिया सन २०२०**

**प्रवेशपत्र**

| आय.डी.क्रमांक |
|---|
| |

| उमेदवार यांनी रकान्यात पासपोर्ट आकाराचे फोटो चिपकवावे |
|---|

**उमेदवाराचे संपूर्ण नाव:**------------------------------------------------------------

**पदाचे नांव** :------------------------------------------------------------

**उमेदवारांची स्वाक्षरी** **प्राधिकृत अधिकारी**

| सदर प्रवेशपत्र भरती प्रक्रियेच्या प्रत्येक टप्प्यावर सादर केलेशिवाय भरती प्रक्रियेमध्ये भाग घेता येणार नाही. |
|---|

## सरळसेवा भरती प्रक्रियेचा कार्यक्रम

### संवर्ग-वनरक्षक

| अ.क्र. | टप्पा | दिनांक |
|---|---|---|
| १. | जाहिरात प्रसिध्द करणे | २५-०१-२०२० |
| २. | ऑफलाईन अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक | दि.१०-०२-२०२० सांय.५.०० वाजेपर्यंत |
| ३. | अर्जाची छानणी करुन पुढील फेरीसाठी पात्र उमेदवारांची यादी प्रकाशित करणे. | दि.१५-०२-२०२० |
| ४. | उपवनसंरक्षक, गडचिरोली वनविभाग यांचे कार्यालयातून प्रवेशपत्र प्राप्त करुन घेणे | दि. २२-०२-२०२० |
| ५. | ऑफलाईन पध्दतीने लेखी परिक्षा | दि.२३-०२-२०२० |
| ६. | लेखी परिक्षेच्या अनुषंगाने आदर्श उत्तरपत्रिका वेबसाईटवर प्रसिध्द करणे. | दि.२४-०२-२०२० सांय.५.०० वाजेपर्यंत |
| ७. | आदर्श उत्तरपत्रिकेच्या अनुषंगाने चुकीच्या छाप प्रश्नाविरुध्द आक्षेप(असल्यास ) प्राप्त करणे | दि.२६-०२-२०२० सांय.५.०० वाजेपर्यंत |
| ८. | लेखी परिक्षेचा निकाल वेबसाईटवर जाहिर करणे. | दि.०७-०३-२०२० |
| ९. | पुढील फेरीसाठी लेखी परीक्षेत किमान ४५% गुण प्राप्त केले आहे अशा पात्र उमेदवारांची यादी वेबसाईटवर प्रसिध्द करणे. | दि.०७-०३-२०२० |
| १०. | कागदपत्रे तपासणे,शारीरिक मोजमाप | दि.११-०३-२०२० दु.१२.०० ते ५.०० वाजेपर्यंत |
| ११. | कागदपत्रे तपासणे व शारीरिक मोजमाप तपासणीमध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांची पुढील टप्प्यासाठी यादी प्रकाशित करणे. | दि.११-०३-२०२० सायं.६.०० वाजेपर्यंत |
| १२. | व धाव चाचणी करिता शारीरिक दृष्टया सुदृढ असलेबाबत वैद्यकीय अधिकारी यांचे कडुन प्राप्त करुन घेतल्या नंतर चाचणी (५ कि.मी./३ कि.मी.) | दि.१२-०३-२०२० सकाळी ६.०० वाजता पासून |
| १३ | सर्वसाधारण गुणवत्ता यादी वेबसाइटवर जाहिर करणे | दि.१६-०३-२०२० सायं.७.०० वा. |
| १४. | लेखी परिक्षेतील व धाव चाचणीतील गुण मिळून निवड यादी व प्रतिक्षा यादी वेबसाईटवर जाहिर करणे | दि.१७-०३-२०२० सायं.७.०० |
| १५. | २५/१६ कि.मी. (पुरुष/महिला) चालण्याची शारीरिक क्षमता चाचणी | दि.२०-०३-२०२० |
| १६ | अंतिम निवड यादी व प्रतिक्षा यादी वेबसाईटवर प्रसिध्द करणे | दि.२०-०३-२०२० सायं.७.०० वा |
| १७. | नियुक्तीचे आदेश निर्गमित करणे | दि.२७-०३-२०२० |